# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः12.12.2024** **वारःगुरुवार**

---

1. युवकांमधला नवोन्मेष आणि तंत्रज्ञान कौशल्य ही देशाची खरी ताकद-पंतप्रधानांचं प्रतिपादन, स्मार्ट इंडिया हॅकेथॉन अंतिम फेरीचा आरंभ
2. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि संयुक्त अरब आमिरातीचे परराष्ट्र व्यवहार मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाह्यान आज नवी दिल्लीत चौथ्या भारत-संयुक्त अरब आमिरात धोरणात्मक संवाद परिषदेत सहभागी होणार
3. गव्हाच्या साठ्याच्या मर्यादेत केंद्र सरकारकडून कपात
4. अफगाणिस्तानचे निर्वासितांसाठीचे मंत्री खालिल रेहमान हक्कानी यांचा काबूलमध्ये आत्मघातकी हल्ल्यात मृत्यू. आणि
5. फिफाच्या 2030 च्या फुटबॉल विश्वकरंडकाचं यजमानपद स्पेन, पोर्तुगाल आणि मोरोक्कोला, तर 2034 च्या विश्वकरंडकाचं यजमानपद सौदी अरेबियाला.

**स्मार्ट इंडिया हॅकेथॉन**

भारताचं सामर्थ्य आमची युवा शक्ती आहे. आणि युवकांमधला नवोन्मेष आणि तंत्रज्ञान कौशल्य ही आमची खरी ताकद असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या अंतिम फेरीतील तेराशे विद्यार्थ्यांशी पंतप्रधानांनी दूरस्थ पद्धतीनं संवाद साधला. देशभरातल्या 51 केंद्रांवर या स्पर्धा सुरू आहेत. देशातले युवक विविध समस्यांवर उपाय शोधून तोडगा काढत सरकारला साथ देत असून यामुळं भारत विकसित होण्याच्या मार्गावर आहे याचा विश्वास वाटतो असं पंतप्रधान म्हणाले. हॅकेथॉनच्या काल सुरू झालेल्या अंतिम फेरीत राज्यातल्या मुंबई, पालघर, बुलडाणा, नांदेड, कोल्हापूर, नाशिक धुळे, पुणे, नागपूर, वर्धा, सोलापूर, ठाणे, सांगली आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमधल्या विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. पुण्यातील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात हार्डवेअर गटाची अंतिम फेरी होत आहे.

**राजकपूर कुटुंबीय**

बहुपैलू चित्रकर्मी राजकपूर यांच्या कुटुंबीयांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीत भेट घेतली. राज कपूर यांची जन्मशताब्दी चौदा डिसेंबरला आहे. त्या निमित्तानं चाळीस शहरांमध्ये तेरा ते पंधरा डिसेंबर या काळात राज कपूर चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला असून, त्यासाठी कपूर कुटुंबीयांनी पंतप्रधानांना आमंत्रण दिलं. राज कपूर यांनी जगाला भारताचं महत्त्व दाखवून दिलं असं पंतप्रधानांनी या प्रसंगी सांगितलं. राज कपूर यांचा करिष्मा मध्य आशियात अजूनही कायम असून, त्यांच्या जीवनावर चित्रपट बनवावा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. मध्य आशियात भारतीय चित्रपटांसाठी खूप संधी असून, ती साधण्याची गरज असल्याचंही ते म्हणाले. तत्कालीन जनसंघाला निवडणुकीत पराभव पत्करावा लागल्यानंतर त्या पक्षाच्या नेत्यांनी राज कपूर यांचा फिर सुबह होगी हा चित्रपट बघण्याचं ठरवलं अशी आठवण मोदी यांनी सांगितलं आणि या पक्षानं आता पहाट बघितली आहे, अशीही पुस्ती जोडली.

**गहू साठा मर्यादा**

गव्हाच्या साठ्याच्या मर्यादेत बदल करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. हे बदल 31 मार्च 2025 पर्यंत लागू असतील. आता मोठे व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी गव्हाच्या साठ्याची मर्यादा दोन हजार टनांवरून एक हजार टनांपर्यंत कमी करण्यात आली आहे. किरकोळ विक्रेत्यांसाठी प्रति विक्री कक्षासाठीची मर्यादा दहा टनांवरून पाच टनांपर्यंत आणण्यात आली आहे. अन्नसुरक्षेचं नियोजन करण्यासाठी आणि काळाबाजार रोखण्यासाठी केंद्र सरकारनं सर्व राज्यं आणि

केंद्रशासित प्रदेशांमधले व्यापारी, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते आणि इतरांसाठी गव्हाच्या साठ्यावर मर्यादा घातली होती. आता त्यात बदल करण्यात आले आहेत. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली आहे. देशात गहू मुबलक प्रमाणावर उपलब्ध असल्याचंही त्यात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**भारत अवकाश स्थानक**

भारताची 2035 पर्यंत भारत अंतरिक्ष स्टेशन हे स्वतःचं अवकाशस्थानक उभारण्याची योजना आहे, असं विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्रसिंह यांनी काल सांगितलं. भारताची 2040 पर्यंत चंद्रावर उतरण्याचीही योजना असल्याचीही माहिती त्यांनी दिली. दिल्लीत विज्ञानविषयक मंत्रालयांची कामगिरी या विषयावर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. केंद्र सरकारनं अवकाश क्षेत्रात केलेल्या सुधारणांची माहिती त्यांनी दिली. आत्तापर्यंत 432 परदेशी उपग्रह भारतातून प्रक्षेपित केले असल्याचं ते म्हणाले आणि त्यातले नव्वद टक्के उपग्रह गेल्या दहा वर्षांमध्ये प्रक्षेपित झाल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. जैवतंत्रज्ञान, जैव-अर्थव्यवस्था, संरक्षण आणि कृषी या क्षेत्रांमध्ये विज्ञानाच्या माध्यमातून भारतानं मोठी भरारी घेतल्याचं त्यांनी नमूद केलं.

**जयशंकर संवाद**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि संयुक्त अरब आमिरातीचे परराष्ट्र व्यवहार मंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाह्यान आज नवी दिल्लीत चौथ्या भारत-संयुक्त अरब आमिरात धोरणात्मक संवाद परिषदेत सहभागी होणार आहेत. नाह्यान आज दुपारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचीही भेट घेणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी संयुक्त अरब आमिरातीच्या नेत्यांचं समाजमाध्यमांवरून स्वागत केलं आहे. या भेटीमुळे उभय देशांमधली भागिदारी आणखी बळकट होईल, असं त्यांनी म्हटलं आहे. भारत आणि संयुक्त अरब आमिरात यांच्यात अनेक शतकांपासून व्यापार होत असून, 2022-23 या वर्षात भारतात थेट परकीय गुंतवणूक करणारा संयुक्त अरब आमिरात हा चौथा देश असल्याचं आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं म्हटलं आहे. भारतात पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात एकंदर 75 अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही आमिरातीनं दिली आहे.

**अफगाणिस्तान मंत्री**

अफगाणिस्तानचे निर्वासितांसाठीचे मंत्री खालिल रेहमान हक्कानी यांचा काल आत्मघातकी हल्ल्यात मृत्यू झाला. काबूलमधील त्यांच्या कार्यालयात हा स्फोट झाला. हक्कानी कागदपत्रांवर सही करत असताना आत्मघातकी हल्लेखोरानं प्रवेश केला आणि त्यानं बॉब उडवून दिला. या हल्ल्यात आणखी सहा जणांचाही मृत्यू झाला. हा हल्ला आयसिसच्या अतिरेक्यांनी घडवून आणल्याचा आरोप अफगाणिस्ताननं केला आहे. मात्र, अजून कोणत्याही संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही. अफगाणिस्तानमध्ये तालिबाननं सत्तेवर ताबा मिळवल्यानंतरचा हा सर्वांत मोठा हल्ला आहे. हक्कानी यांचे पुतणे सिराजुद्दिन हक्कानी हे तालिबान सरकारमध्ये गृहमंत्री आहेत. खलिल हक्कानी हे अमेरिकेनं दहशतवादी संघटनेच्या यादीत समाविष्ट केलेल्या हक्कानी नेटवर्क या संघटनेचे महत्त्वाचे सदस्य होते.

**मोदी बँकिंग**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारताच्या बँकिंग क्षेत्रात विशेषतः सार्वजनिक बँकांमध्ये आमूलाग्र बदल झाले, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा पैसा भ्रष्टाचारासाठी वापरला जात असल्याचा कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी यांचा आरोप तथ्यहीन असल्याचं सीतारामन यांनी स्पष्ट केलं आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा विशिष्ट उद्योगपतींसाठी एटीएम म्हणून वापर केला जात असे, अशीही टीका सीतारामन यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात केली आहे. मोदी सरकारच्या काळात 54 कोटी जनधन खाती उघडण्यात आली आहेत आणि विविध योजनांच्या अंतर्गत 52 कोटी तारणविरहित कर्जप्रकरणं मंजूर झाल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

**फिफा यजमानपद**

पुरुषांच्या 2030 च्या फुटबॉल विश्वकरंडकाचं यजमानपद स्पेन, पोर्तुगाल आणि मोरोक्कोला, तर 2034 च्या विश्वकरंडकाचं यजमानपद सौदी अरेबियाला मिळाल्याचं आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघ म्हणजे फिफानं म्हटलं आहे. फिफाची

विशेष बैठक काल पार पडली. त्यात मतदानानंतर यजमान देशांची घोषणा करण्यात आली. 2030 हा विश्वकरंडक स्पर्धेचं शतकपूर्ती वर्ष असल्यानं त्या वर्षीचे तीन सामने अर्जेंटिना, पॅराग्वे आणि उरुग्वेमध्येही खेळवले जाणार आहेत.

**फिडे अंतिम सामना**

फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत आज दुपारी भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश आणि चीनचा गेल्या वेळचा विजेता डिंग लिरेन यांच्यात चौदावा आणि अंतिम सामना होणार आहे. या सामन्यातील विजेत्याला जागतिक विजेत्याचा मान मिळणार आहे. हा सामना अनिर्णित राहिल्यास उद्या स्पीडचेस प्रकारातून विजेता निवडला जाईल. काल गुकेश आणि लिरेन यांच्यात तेरावा सामना पाच तासांच्या लढतीनंतरही अनिर्णित राहिला. दोन्ही खेळाडूंना सध्या प्रत्येकी साडेसहा गुण मिळाले आहेत.

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया 2025 हिवाळी स्पर्धा लडाख आणि जम्मू-काश्मीरमध्ये दोन स्वतंत्र टप्प्यांमध्ये होणार आहेत. लडाखमध्ये 23 ते 27 जानेवारी या काळात आईस हॉकी आणि आईस स्किइंगसारख्या स्पर्धा होणार आहेत, तर जम्मू-काश्मीरमध्ये 22 ते 25 फेब्रुवारी या काळात अल्पाइन स्किइंग, स्नोबोर्डिंग अशा स्पर्धा होणार आहेत. केंद्रीय क्रीडामंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी ही माहिती दिली.

**क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात काल पर्थ इथे झालेल्या पन्नास षटकांच्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियानं भारताचा 83 धावांनी पराभव करत ही संपूर्ण मालिका जिंकली. 299 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताचा डाव 45 षटक आणि एका चेंडूत 215 धावांतच आटोपला. भारताकडून स्मृती मंधानाने सर्वाधिक 105 धावा केल्या. अरुंधती रेड्डीनं 4 बळी घेतले. तत्पूर्वी, ॲनाबेल सदरलँडच्या शतकाच्या जोरावर ऑस्ट्रेलियानं 6 गडी गमावून 298 धावा केल्या. ॲनाबेलनं 95 चेंडूत 110 धावा केल्या.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार